# सायबर जनजागृती रथाचे उद्‌घाटन

## पोलिस कार्यालयात कार्यक्रम ; पोलिस उपमहानिरीक्षकांची उपस्थिती

**नांदेड, ता. ५ (बातमीदार)** : जनतेमध्ये सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती करण्यासाठी सायबर जनजागृती रथाचे आयोजन करण्यात आले असून हा रथ जिल्ह्यातील ३६ पोलिस ठाण्यातंर्गत शाळा, महाविद्यालय तसेच गर्दीच्या भागात असे एकूण १२८ ठिकाणी सायबर जनजागृती करणार आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. शशीकांत महावरकर यांच्या हस्ते या सायबर रथाचे बुधवारी (ता. पाच) उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराय धरणे, मुख्यालयाच्या पोलिस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, जनसंपर्क अधिकारी शिवाजी लष्करे, श्रीमती अलका कहाळेकर आदी उपस्थित होते.



**नांदेड ः जिल्हा पोलिस विभागातर्फे सायबर सुरक्षेविषयी पथनाट्यद्वारे जनजागृती करणाऱ्या रथाचे उद्‌घाटन परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक डॉ. शशिकांत महावरकर यांच्या हस्ते बुधवारी झाले. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

नांदेड पोलिस विभाग आणि क्वीकहिल फाऊंडेशन यांच्या संकल्पनेतून हा सायबर सुरक्षा रथ तयार करण्यात आला आहे. याबाबत पथनाट्य सादर करून त्याद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. या पथनाट्यामध्ये सातारा येथील आधार सामाजिक विकास संस्थेचे सुनील नलावडे, मल्हारी जाधव, राजेंद्र मोरे, ऋत्विक रास्ते, सुयश बाबर, किरण घोदे, गणेश महाजन आदी कलाकारांनी भाग घेतला आहे. सायबर पोलिस ठाण्याचे फौजदार जी. बी. दळवी, सोपान थोरवे, पोलिस अंमलदाल दीपक ओढणे, काशीनाथ कारखेडे आदींनी नियोजन केले होते.

### पथनाट्यातून सायबर जनजागृती

ऑनलाइन व्यवहाराचे वाढते प्रमाण, मोबाईलच्या अतिवापरामुळे होणार परिणाम, सोशल मीडिया व ऑनलाइन पेमेंट ॲप वापरताना कोणती खबरदारी घ्यावी, ऑनलाइन फसवणुक होणार नाही, यासाठी काय दक्षता घ्यावी तसेच सोशल मीडियाचे प्रोफाईल लॉक केले नसल्यामुळे आपल्या मोबाईलवर आलेला ओटीपी दिल्याने, कोणत्याही अनोळखी लिंकला क्लिक करून त्यावर बँक खात्याची माहिती दिल्याने कशाप्रकारे फसवणुक होते, याबाबत पथनाट्य सादर करून सायबर जनजागृती करण्यात येणार आहे.